# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


## इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७

## प्रसिध्दी पत्रक

**दिनांक २९.०६.२०१६.**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ साठी ची प्रथम गुणवत्ता यादी केंद्रीय प्रवेश समितीमार्फत दि.२७.०६.२०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन जाहिर करण्यात आलेली आहे. याबाबत विद्यार्थ्यांना त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस करण्यात आलेले आहेत.

प्रथम गुणवत्ता यादीनुसार ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार व पसंतीक्रमांकानुसार जे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहे अशा आज अखेर २२६४७ विद्यार्थ्यांनी अद्याप तात्पुरता प्रवेश घेतलेला नाही. तरी सदरच्या २२६४७ विद्यार्थ्यांनी प्रथम गुणवत्ता यादीनुसार गुणवत्तेनुसार आपणांस मिळालेल्या त्या कनिष्ठ महाविद्यालयात संबधित विद्यार्थ्यांनी दि.३०.०६.२०१६ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत रु.५०/- भरुन आपला तात्पुरता प्रवेश निश्चित करावा. जे विद्यार्थी रु.५०/- भरुन आपला प्रवेश निश्चित करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना बेटरमेंट (उन्नत प्रवेशाची ) संधी मिळणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तात्पुरता प्रवेश न घेतल्यास संबधित विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतुन बाहेर जाईल व कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन प्रवेश (Offline) मिळणार नाही व असे (Offline) ऑफलाईन नियमबाहय प्रवेश रद्द केले जातील याची नोंद घ्यावी. म्हणून आपणांस जे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहे तेथे तात्पुरता प्रवेश आजच घ्यावा असे आवाहन इ.११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीकडुन करण्यात येत आहे. दि. ३०.०६.२०१६ नंतर अशा विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार/ विनंती ऐकुन घेतली जाणार नाही त्यामुळे ही शेवटची संधी आहे.

बेटरमेंटचे (उन्नत प्रवेश) प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीनेच होणार आहेत यासाठी वेगळा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१